नि.फौ.ख.क्रं. २९२/२०२१
शासन–वि–किरण सावंत
निशाणी क्रं. २३

सरकार तर्फे साक्षीदार क्रं. ०१
मी शपथेवर खरे सांगतो की,
माझे नाव– अक्षय गोकुळ तरंगे
वय– २८ वर्ष, धंदा –बिगारी काम ,
रा. रत्नापूर , ता. परंडा जि. उस्मानाबाद ह. मु. पुणे

**सरतपास श्री. व्ही. एस. गायकवाड सरकारी वकील यांच्या मार्फत**

दिनांक ०१.०९.२०२१ रोजी ४.३० ते ५–०० च्या दरम्यान पोलीसांनी मला सही करण्यासाठी बोलावले होते. पोलीसांनी माझ्या समक्ष कोणतीही घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याची कार्यवाही केली नाही. पोलिसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. आता मला पोलीसांनी केलेला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीस **नि.क्र. २४** देण्यात येते.

**साक्षीदार सरकारी पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदारास उलटतपासात विचारण्यात येणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१.०९.२०२१ रोजी ४.३० ते ५–०० च्या दरम्यान पोलीसांनी मला रत्नापूर शिवार येथे बसस्टॅन्डजवळ बोलावून सांगितले की, हॉटेल जय हनुमान च्या पाठीमागे एक ईसम किरण सावंत बेकायदेशीररित्या देशी दारुचा चोरटा विक्री व्यवसाय करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला तेथे छापा मारायचा आहे व तुम्ही तेथे पंच म्हणून हजर रहा असे सांगितल्याने मी होकार दर्शविला. हे म्हणणे खरे नाही की, तेथे माझ्यासोबत पोलीस व दुसरे पंच धर्मपाल कल्याण गायकवाड होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सदर ठिकाणी छापा मारला. हे म्हणणे खरे नाही की, छापा मारल्यानंतर तेथे एक इसम मिळुन आला. हे म्हणणे खरे नाही की, सदर ईसमाने त्याचे नांव किरण जालिंदर सावंत असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी कापडी पिशवीमध्ये मॅकडॉल नं. १ कंपनीच्या प्रत्येकी १८० मिली च्या एकूण ०५ बॉटल्स व देशी दारु संत्रा स्पेशल कंपनीच्या प्रत्येकी १८० मिलीच्या एकुण ५१ बॉटल्स ज्याची प्रत्येकी किंमत ६०/– रुपये असा एकुण ३८६०/– रुपयेचा मुद्देमाल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, सदर मुद्देमाल

पोलीसांनी जप्त करून ताब्यात घेतला. हे म्हणणे खरे नाही की, सदर जप्त मुद्देमालापैकी प्रत्येकी एक सिलबंद १८० मिलीची बॉटल पोलीसांनी सीए साठी जप्त करून त्यावर माझ्या व पोलीसांच्या सहीचे लेबल लावले. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा सविस्तर पंचनामा पोलीसांनी माझ्या समक्ष केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सविस्तर पंचनामा करुन पंचनामा वाचून सदर पंचनामावर मी सही केली. मी आरोपीला ओळखतो. आरोपी माझ्या गावचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्याने आरोपीला शिक्षेपासून वाचवण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ ए. एम. खबाले यांनी**

नाकारला.

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

ASMITA NIVRUTTIRAO NIWADANGE

Digitally signed by ASMITA NIVRUTTIRAO NIWADANGE Date: 2026.08.14 17:57:52 +0530

दि. १४/०८/२०२६

(अ.नि.निवडंगे)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,परंडा.